निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २५७ वा.
शुक्रवार : २१ नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पीएम किसान सन्मान निधीचा २१ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात ऑनलाईनरित्या जमा

# विषमुक्त शेती करणे हेच देशाचे मिशन - राज्यपाल आचार्य देवव्रत

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे प्रतिनिधी/** विषमुक्त शेती करणे हेच देशाचे मिशन असून नैसर्गिक व सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांकडून प्रेरणा घेऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळावे, असे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २१ व्या हप्त्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तामिळनाडू राज्यातील कोईम्बतूर येथून ऑनलाइन पद्धतीने वितरण झाले. या कार्यक्रमास कृषी महाविद्यालय पुणे येथून दूरदृष्य प्रणालीद्वारे राज्यपाल आचार्य देवव्रत उपस्थित होते. यावेळी कृषी विभागाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात शेतकऱ्यांशी संवाद साध-ताना ते बोलत होते. कार्यक्रमाला कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, राज्यपाल यांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, राज्यपाल यांचे उप सचिव राममूर्ती आदी उपस्थित होते.

राज्यपाल श्री. देवव्रत म्हणाले, राज्यात काही शेतकरी नैसर्गिक व सेंद्रिय शेती करुन स्वत:च नवनवीन शोध लावत आहेत. एकप्रकारे ते शास्त्रज्ञाचे काम करीत आहेत. त्यांचा शोध इतरांना मार्गदर्शक आहे. अति प्रमाणात रसायने फवारल्याने रोपांचे नुकसान होते. नैसर्गिक घटकांपासून तयार केलेले द्रव्य अग्नीअस्त्र व निमास्त्राचा आलटून- पालटून फवारणी केल्यास शेतामध्ये कधीही निमॅटोडची समस्या राहणार नाही.

राज्यपाल देवव्रत यांनी शेतीविषयी आपले अनुभव कथन करून पिकांचे संरक्षण आणि उत्पादन वाढविण्यासाठी नैसर्गिक शेती पद्धतीविषयी माहिती दिली.






यावेळी आयुक्त श्री.मांढरे यांनी 'पी एम किसान सन्मान निधी' योजनेसंदर्भात माहिती दिली. ते म्हणा-ले राज्यातील लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यात २१ व्या हप्त्यापोटी १ हजार ८०८ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. योजनेच्या निकषानुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास रुपये २ हजार प्रती हप्ता याप्रमाणे तीन समान हप्त्यात दरवर्षी एकूण ६ हजार रुपये जमा करण्यात येतात. आत्तापर्यंत ३६ हजार कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी राज्यपाल श्री. देवव्रत यांच्या हस्ते जिल्ह्यातील नैसर्गिक शेती करणाऱ्या मंगेश भास्कर, दत्त-त्रय निगडे, रामदास लांडगे, अनिल पायगुडे व लहू फाले या शेतकऱ्यांचा प्रातिनिधिक स्वरुपात सत्कार करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीतील अनुभव सांगितले.

## मुख्यमंत्री सचिवालयातील कर्मचारी राजेंद्र शिंदे यांना श्रद्धांजली

**मुंबई /** मुख्यमंत्री सचिवालयातील कर्मचारी राजेंद्र शिंदे यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक संवेदना व्यक्त करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. तर मुख्यमंत्री सचिवालयातील अधिकारी-कर्मचारी यांनीही दिवंगत शिंदे यांना श्रद्धांजली अर्पण केली.

मुख्यमंत्री सचिवालयातील कर्मचारी राजेंद्र शिंदे यांचे बुधवारी (दि.१९) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मुख्यमंत्री सचिवालयात मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासह उपस्थित अधिकारी-कर्मचारी आदींनी श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या कुटुंबाप्रती संवेदना व्यक्त करत, या कठीण प्रसंगी संपूर्ण सचिवालय शिंदे कुटुंबाच्या पाठिशी असल्याची भावना व्यक्त केली.

## टोयोटा किर्लोस्कर मोटार कंपनी आणि व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयामध्ये सामंजस्य करार

### ४५ आयटीआयमध्ये सुसज्ज प्रयोगशाळांची उभारणी; ८ हजार विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी

**मुंबई /** राज्यातल्या तरुणांना दर्जेदार रोजगाराभिमुख औद्योगिक प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या जागतिक संधी निर्माण करण्याच्या कौशल्य विकास विभागाच्या उद्दिष्टानुसार मंत्रालयात कौशल्य, रोजग-ार व उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या उपस्थितीत टोयोटा किर्लोस्कर मोटार कंपनी आणि व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयामध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

या करारान्वये टोयोटा किर्लोस्कर मोटार कंपनी राज्यातील ४५ आयटीआय संस्थांमध्ये (एलएमव्ही) हलकी वाहन तंत्रज्ञ अभ्यासक्रमांसाठी सुसज्ज प्रयोगशाळांची उभारणी करणार असून तेथे शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे ८ हजार आयटीआय विद्यार्थ्यांना रोजग-ाराची संधी उपलब्ध होणार आहे.



कौशल्य मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनात टोयोटा-किर्लोस्कर कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष विक्रम गुलाटी आणि व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालिका माधवी सरदेशमुख यांनी सामंजस्य करारावर स्वा-क्षरी केल्या. येत्या दोन महिन्यात कंपनीकडून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असून मार्च २०२६ पर्यंत पहिल्या टप्प्यात १३ प्रयोगशाळा सुरु करण्यात येणार असल्याची माहिती कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष विक्रम गुलाटी यांनी दिली. तर तीन टप्प्यात उर्वरित प्रयोगशाळा सुरु करण्यात येणार आहेत.

राज्यातल्या आयटीआयच्या विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विभाग नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असून विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या दर्जेदार प्रशिक्षणामुळे रोजगाराच्या जागतिक संधी उपलब्ध होतील असा विश्वास यावेळी कौशल्य मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केला.

तसेच राज्य शासनाकडे आयटीआयच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा, उद्योग क्षेत्रातील ज्ञान, अनुभव या सहभागातून कुशल व रोजगारक्षम मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी उद्य-ोग समूहांचे सहकार्य आवश्यक असल्याचे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

पुढच्या काळात या अनुषंगाने अनेक रोजगाराभिमुख सामंजस्य करार होतील, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाचे सह संचालक सतीश सूर्यवंशी, टोयोटा किर्लोस्कर कंपनीचे उपाध्यक्ष रमेश राव, कंपनीचे मानव संसाधन व्यवस्थापक भास्कर पै आणि मुख्य व्यवस्थापक रवी सोनटक्के उपस्थित होते.

## लाडक्या बहिणींसाठी महत्त्वाची बातमी! आचारसंहितेमुळे नोव्हेंबरला हप्ता लांबणार का?

**मुंबई /** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरू झालेल्या लाडली बहेन योजनेअंतर्गत, १ कोटींहून अधिक लाभार्थ्यांचे ई-केवायसी अजूनही प्रलंबित आहे. ई-केवायसी पूर्ण करण्याची अंतिम तारीख १८ नोव्हेंबर आहे. महिला आणि बालविकास विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मते, लाडली बहेन योजनेत अंदाजे २.३५ कोटी लाभार्थी आहेत, त्यापैकी फक्त १.३ कोटी महिलांनी आतापर्यंत ई-केवायसी पूर्ण केले आहे. आवश्यक असल्यास, आम्ही अंतिम मुदत वाढवू, असे ते म्हणाले.

सुरुवातीला, या योजनेअंतर्गत अंदाजे २.५ कोटी लाभार्थ्यांची नोंदणी झाली होती. यापैकी मोठ्या संख्येने महिलांवर लाभांचा गैरवापर केल्याचा आरोप होता, ज्यामुळे अनेकांची नावे वगळण्यात आली. परिणामी, ई-केवायसी प्रक्रिया सुरू करण्यात आली, ज्यामध्ये सुरुवातीला मोठ्या अडचणी आल्या. काही दिवसांतच ही प्रणाली सुव्यवस्थित झाली, ज्यामुळे मोठ्या संख्येने महिला ई-केवायसी पूर्ण करत आहेत. ई-केवायसी काही मिनिटांत ऑनलाइन करता येते.

**बिहारमध्येही १० हजार रुपये देण्यात आले**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी सरकारने गरजू महिलांना १५०० रुपये मासिक भत्ता जाहीर केला. निवडणूक निकालांनंतर, एनडीएच्या प्रचंड विजयात ही योजना महत्त्वाची मानली जात होती. शुक्रवारी बिहारमध्येही एनडीएने मोठा विजय मिळवला. निवडणुकीच्या अगदी आधी मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेअंतर्गत महिलांसाठी १०००० रुपयांची योजना जाहीर केली. हे पैसे एकाच दिवसात ७५ लाख महिलांच्या खात्यात जमा करण्यात आले. एनडीएने




बिहार विधानसभेच्या २४३ पैकी २०० हून अधिक जागा जिंकल्या.

**निवडणुकीपर्यंत कठोर भूमिका नाही**

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. येत्या काळात २९ महानगरपालिकांमध्येही निवडणुका होणार आ-हेत. एका वरिष्ठ नेत्याने सांगितले की, लाडली बहेन योजनेच्या लाभार्थ्यांवर सरकार यावेळी कठोर भूमिका घेणार नाही. काही महायुती नेते ई-केवायसीसाठी नोंदणी काउंटर देखील सुरू करत आहेत. अलीकडेच, भाजपने बहेन लाडली, भाऊबीज देवाभाऊ की मोहिमेअंतर्गत महिलांपर्यंत पोहोचण्यासाठी मुंबईतील अनेक भागात रॅली आयोजित केल्या. सरकारने अलीकडेच शिवभोजन थाळी या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी निधी देखील जारी केला. महायुतीने (महायुती) आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात महिलांना देण्यात येणारी रक्कम २१०० रुपये करण्याचं आश्वासन दिलं होतं, पण ते आश्वासन अपूर्णच राहिलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर अर्थसंकल्पीय अधिवेशनात वाटप होणाऱ्या निधीवर या योजनांचे भवितव्य अवलंबून असेल.

## '... तर आम्हाला काही जागा सोडाव्या लागतील', सचिन अहिर यांचा सूचक इशारा

**मुंबई /** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरुन राजकारण पेटताना दिसत आहे. २ डिसेंबर रोजी असणाऱ्या या निवडणुकांसाठी होणाऱ्या जागा वाटपावरुन वाद होताना दिसत आहे. या निवडणुकांच्या दृष्टीकोनातून नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या जागा वाटपाच्या मुद्यावरुन अनेकांनी दिल्लीवारी केल्या.

या सगळ्यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सचिन अहिर यांनी या सगळ्या परिस्थितीवर सूचक इशारा दिला आहे.

दिल्ली दौऱ्यावर काय बोलले अहिर?

नेहमी मित्र पक्षांचे नेते दिल्लीला जाताना दिसत आहेत. गेल्या आठवड्यात पवारांना जावे लागले. मग शिंदे यांना जावे लागले.

कुबड्यांची गरज नाही असे म्हटल्यावर फेऱ्या वाढल्या आ-हेत, असं सचिन अहिर यांनी म्हटलं आहे. नगरपालिकेत भाजप विरुद्ध इतर असं दिसतंय.आजी आणि माजी आमदारमध्ये मोठा वाद दिसून येत आहे. त्यांना कोणी रोखत नाही.

एकला चलो रे भूमिका त्यांची दिसून येत आहे. उध्दव ठाकरे स्मारक नियुक्ती म्हणून नाराजी व्यक्त केली आहे. ढाल बनवायची असेल तर बाळासाहेबांचे नाव घेऊन उद्धव ठाकरे यांच्या अंगावर



जायचे. राजीनामा दिल्यावर इतका वेळ का लागला हा मुद्दा आहे, असा प्रश्न देखील सचिन अहिर यांनी विचारला आहे.

समिती गठित होण्यासाठी इतका वेळ का? निधीची तरतूद क्रमप्राप्त आहे.

प्रथा परंपरा नुसार कुटुंबातील व्यक्ती ट्रस्टवर असतो. आंबेडकर स्मारकावर प्रकाश आंबेडकर आहेतच की? असा सवालही त्यांनी विचारला आहे. त्या त्या व्यासपीठावर राजकीय शत्रू आहेतच की त्यावर आम्हीच टीका करतो.भाजपसोबत आमची जवळीक नाही, असं सचिन अहिर यांनी स्पष्ट केलं आहे.

भाजपात आलबेल नाही

भाजपने एकहाती निर्णय घ्यायला सुरुवात केली आहे. अलबेल नाही आणि दुष्परिणाम सामन्यांना भोगावे लागत आहे.

महापालिका आठवली की देशप्रेम आठवते.

नाहीतर मांडीला मांडी लावून बसतात. नवाब मलिक यांच्यावरच आरोप चुकीचे हे त्यावेळी आम्ही बोललो होतो. भाजप सोयीनुसार विषय घेतो अशी टीका सचिन अहिर यांनी केली आहे.

जागावाटपावर काय बोलले

मित्रपक्ष म्हणून काही जागांचा त्याग आम्हाला करावा लागेल. आमच्या महापालिकेच्या जागा आम्हाला शाबूत ठेवावे लागत आहे. आमचे नवे अनेक निष्ठावान आमच्यासोबत आहेत.

पण मित्रपक्षाला पण काही गोष्टी द्यावे लागतील. साहेबांनी स्वतः अनेकांशी चर्चा केल्या आ-हेत. आढावा आणि रिपोर्ट आम्ही साहेबांकडे सुपूर्त केले आहे,

अशी प्रतिक्रिया सचिन अहिर यांनी दिली आहे.

# शेख हसिना यांना मृत्युदंडाची शिक्षा का सुनावण्यात आली ?

बांगलादेशच्या इंटरनॅशनल क्राइम्स ट्रिब्यूनलने माजी पंतप्रधान शेख हसिना यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. बांगलादेशच्या हंगामी सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी शेख हसिना यांना सुनावण्यात आलेल्या शिक्षेचे स्वागत केले असून भारताने शेख हसिना यांना बांगलादेशच्या स्वाधीन करावे असे आव्हान केले. दोन वर्षापूर्वी बांगलादेशमध्ये जो उठाव झाला त्या उठावानंतर बांगलादेशमध्ये सत्तेवर असलेल्या त्या देशाच्या तत्कालीन पंतप्रधान शेख हसिना यांनी भारतात पलायन केले त्या अजूनही भारतातच आश्रयाला आहेत. शेख हसिना यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावल्यानंतर बांग्लादेशात पुन्हा हिंसाचार उसळला शेख हसिना यांच्या समर्थकांनी बांग्लादेशात धुडगूस घातला अजूनही तेथे उग्र निदर्शने होत आहेत मात्र तेथील हंगामी सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस हे आंदोलकांना दाद देत नाहीत. मोहम्मद युनूस यांनी तेथील प्रसार माध्यमांना शेख हसिना यांची या शिक्षेवरील प्रतिक्रियाही छापण्यास मनाई केली आहे. मोहम्मद युनूस शेख हसिना यांना लवकरात लवकर मृत्युदंड देण्यावर ठाम आहे पण भारत शेख हसिना यांना बांगलादेशच्या स्वाधीन करेल असे वाटत नाही. शेख हसिना या भारताच्या आश्रित आहे आहे त्यांची सुरक्षा ही भारताची जबाबदारी आहे. शेख हसिना यांना सुनावण्यात आलेली शिक्षा अपेक्षितच होती कारण काही महिन्यापूर्वी भारतीय प्रसार माध्यमांशी बोलताना शेख हसिना यांनी बांग्लादेशात परतण्याची घोषणा केली होती. शेख हसिना यांनी बांग्लादेशात परतण्याची घोषणा केल्यापासून मोहम्मद युनूस हे अस्वस्थ आहेत. पंतप्रधान पदावर असलेल्या शेख हसिना यांना हिंसक निदर्शनांमुळे देश सोडवा लागल्यावर तात्पुरती व्यवस्था म्हणून हंगामी सरकार स्थापन करण्यात आले. या सरकारचे हंगामी प्रमुख म्हणून नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनूस यांची नियुकी करण्यात आली. त्यांची नियुक्ती करण्यात आली त्याचवेळी सांगण्यात आले की सहा महिन्याच्या आत निवडणूका घेऊन लोकनियुक्त सरकार स्थापन करण्यात येईल मात्र दोन वर्ष झाली तरी मोहम्मद युनूस निवडणुकीची घोषणा करत नाही. त्यांना भीती आहे की निवडणूक झाली तर ते पुन्हा पंतप्रधान होणार नाहीत. काहीही करून आपली खुर्ची टिकवण्यासाठी ते धडपडत आहेत त्यासाठी ते अमेरिका पाकिस्तान आणि चीनची मदत घेत आहेत. शेख हसिना यांच्या विरोधात झालेल्या आंदोलनामागे अमेरिका होती हे आता लपून राहिले नाही. अमेरिकेला बांगलादेशातील सेंट मार्टिन हे बंदर हवे आहे. शेख हसिना अमेरिकेस हे बंदर देण्यास उत्सुक नव्हत्या त्यामुळेच अमेरिकेने बांगलादेशातील शेख हसिना यांच्यावर नाराज असलेले नागरिक तसेच कट्टरपंथीयांना हाताशी धरून शेख हसिना यांचे पंधरा वर्षाचे सरकार उधळून लावले. पाकिस्तान आणि चीनलाही त्या नकोशा होत्या कारण सत्तेवर असताना त्यांचे भारताशी सौहार्दाचे संबंध होते पाकिस्तान आणि चीनला त्या नकोशा होत्या म्हणून त्यांनीही या आंदोलनाला हवा दिली आणि मोहम्मद युनूस नावाचे बाहुले आणून बसवले. हेच मोहम्मद युनूस आज अमेरिका, चीन आणि पाकिस्तान यांच्या नादी लागून भारताला पाण्यात पाहत आहेत. मोहम्मद युनूस जितके दिवस खुर्चीवर राहतील तितका अमेरिका, पाकिस्तान आणि चीनचा फायदा होणार आहे. पुढील काही महिन्यात मोहम्मद युनूस हे सेंट मार्टिन बेट अमेरिकेच्या घशात घालणार आहेत. जर शेख हसिना बांग्लादेशात आल्या आणि निवडणुका झाल्या तर नवीन सरकार आपल्या विचारांचे असेलच असे नाही आणि जर शेख हसीनांचेच सरकार पुन्हा आले तर त्या भारताशीच मैत्री करणार हे चीन आणि पाकिस्तान जाणून आहेत त्यामुळे त्यांनी बांगलादेशात येऊच नये आणि जरी आल्या तरी त्यांना थेट ढगात पाठवून आपले मनसुबे पूर्ण करण्याचा अमेरिका, चीन आणि पाकिस्तान यांचा डाव आहे त्यासाठीच शेख हसिना यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

# वाढता भ्रष्टाचार;देशातील छुपा आतंकवाद नाही का?यांना फाशीच्या सजेचे प्रावधान केव्हा!

आज देशात वाढत्या भ्रष्टाचारामुळे सर्वसामान्यांन पुढे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.यामुळे सर्वांचेच जिवन दिवसेंदिवस पोखरत चाललेले आहे. भ्रष्टाचारी देशाच्या १४० कोटी जनतेचे रक्त कळत-नकळत पित असतो व आताही पितांना दिसतात. भ्रष्टाचारी भ्रष्टाचार करतात परंतु यावर पडदा टाकण्यासाठी नावापुरती एखाद्या समितीची नियुक्ती करून भ्रष्टाचाऱ्यांवर पांघरूण घातल्या जाते यामुळे भ्रष्टाचाऱ्यांच्या केसालाही धक्का लागत नाही आणि त्यांचे मनोबल आणखी वाढते ही आजची सत्य परिस्थिती आहे. नंतर हळूहळू भ्रष्टाचारी आपोआप मुक्त होतो आणि या भ्रष्टाचारामुळे भरडल्या जातो सर्वसामान्य नागरिक,गरीब, शेतकरी,मोलमजुर व बेरोजगार. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की आतंकवादी देशाचे कट्टर दुश्मन आहेच त्यांचा खात्मा व्हायलाच पाहिजे यात दुमत नाही आणि त्यांना मरेपर्यंत कठोर शिक्षा व्हायलाच पाहिजे.तीच सजा भ्रष्टाचाऱ्यांना सुध्दा व्हायला पाहिजे.कारण भ्रष्ट राजकीय पुढारी गोरगरीबांचे, शेतकऱ्यांचे रक्त पिऊन वाममार्गाने पैसा कमवून करोडपती होतात त्यांना सुध्दा आतंकवाद्यांसारखी कठोर शिक्षा व्हायलाच हवी तेव्हाच भारत भ्रष्टाचार मुक्त होईल हेही तितकेच सत्य आहे.त्याचप्रमाणे अनेक घोटाळेबाजांनी भ्रष्टाचार करून विदेशात करोडो ते अरबो रूपये डांबून ठेवले आहे यांच्यावर सुध्दा सरकारने ताबडतोब कठोर कारवाई करायला पाहिजे.भारत कृषिप्रधान देश आहे परंतु आपला शेतकरी संपत्तीने करोडपती असुन सुद्धा आर्थिक दृष्ट्या शुन्य आहे व मुठभर काही राजकीय पुढारी वाममार्गाने भ्रष्टाचाराच्या माध्यमातून करोडो रुपये कमवुन शेतकरी,गरीब व सर्वसामान्य अशाप्रकारे १४० कोटी जनतेचे कळत-नकळत रक्त पितांना दिसतात.देशात वाढत्या भ्रष्टाचारामुळे हजारो समस्या निर्माण झालेल्या आहेत की,त्याची आपण गणना सुध्दा करू शकत नाही.सध्याच्या परिस्थितीत देशात सर्वांत जास्त दुःखी असेल देशाचा अन्नदाता शेतकरी.परंतु शेतकऱ्यांच्या जखमेवर फुंकर घालण्यापेक्षा त्यांच्या जखमेवर मिठ चोळण्याचे काम मुठभर काही राजकीय पुढारी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून करतांना दिसतात.आज देशात सर्वांत जास्त श्रीमंत असेल तर मुठभर काही राजकीय पुढारी यांना,उन, पाऊस, थंडी, सुनामी, अवकाळी पाऊस,ओला दुष्काळ,सुखा दुष्काळ याची यत्किंचितही चिंता नसते. कारण ही मंडळी चार भिंतींच्या आत बसलेल्या असतात यांच्या चारही भिंतींला बुलेटप्रुफ आवरण असते.त्यामुळे भ्रष्ट नेत्यांना शेतकरी,गरीब, बेरोजगार व सर्वसामान्य यांच्याशी काहीही देणेघेणे नसते. आतंवादी खुनखराबा करतात तेव्हा रक्ताचा लाथोळा दिसतो.परंतु भ्रष्ट राजकीय पुढारी आमजनतेला, शेतकऱ्यांना, गरीबांना स्लोपॉयझन देवुन पोखरत असतात व कळत-नकळत त्यांचा मृत्यू होतो याला जबाबदार आजचा भ्रष्ट राजकीय पुढारीच. आजचा मुठभर राजकीय पुढारी कमी दिवसांत करोडपती झाल्याचे दिसून येते आणि यामुळेच देशात महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, बेरोजगारीची समस्या, आरोग्याची समस्या, शिक्षणाची समस्या निर्माण होतांना दिसतात. आज राजकीय पुढाऱ्यांच्या भ्रष्ट नितीमुळे देश व देशाची जनता, शेतकरी, सर्वसामान्य १० वर्षे मागे गेल्याचे दिसून येते.२०१४ पासून ईपीएस ९५ पेंशनधारक जगण्याइतकी ७५०० रूपये पेंशन व महागाई भत्ता मिळावा यासाठी संघर्ष करीत आहे व केंद्र सरकारकडे मागणी करीत आहेत. परंतु सरकार याबद्दल यत्किंचितही विचार करतांना दिसत. यासाठी सरकार फक्त तारीख पे तारीख अशी भूमिका घेतांना दिसते.देशाला जर सुजलाम सुफलाम करायचे असेल तर सर्वप्रथम भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजे.फक्त मुसक्या आवळून चालणार नाही तर आतंकवाद्यांना ज्याप्रमाणे कठोर शिक्षा ठोठावली जाते त्याचप्रमाणे भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांना शिक्षा व्हायलाच हवी.तेव्हाच देशाचा चेहरा-मोहरा बदलल्याचे अवश्य दिसून येईल यात तिळमात्र शंका नाही.आज देशात तस्करी,अवैध धंदे होतांना आपण जे पहातो त्यामागे काही राजकीय पुढाऱ्यांचा अवश्य हात दिसून येतो आणि यातुनच भ्रष्टाचाराचा उगम होतो.आजही आपण पहातो की देशातील अनेक राज्यांमधील अती दुर्गम भागातील विकास नगन्य आहे त्यामुळे आजही अती दुर्गम भागात कुपोषणामुळे मृत्यूचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. देशातील राजकीय पुढाऱ्यांनी अती दुर्गम भागांकडे जातीने लक्ष केंद्रित केले असते तर आज अती दुर्गम भाग सुध्दा सुजलाम सुफलाम दिसला असता. देशातील राज्य सरकारांनी व केंद्र सरकारने राजकीय पुढाऱ्यांच्या संपत्ती बद्दल एक सिमा आखणे आजच्या परिस्थितीत अती आवश्यक झाले आहे.राजकीय पुढाऱ्यांजवळ जास्तीत जास्त किती चल-अचल संपत्ती असावी यावर केंद्र सरकारने व राज्य सरकारांनी गाईड लाईन निश्चित करणे गरजेचे आहे.तेव्हाच भ्रष्टाचाऱ्यांवर नियंत्रण ठेवता येईल.देशातील कोणताही भ्रष्टाचारी असो त्याला कठोर शिक्षा झालीच पाहिजे.आपण पहातो राजकीय पुढारी जेव्हा निवडणूक येतात तेव्हा मोठ्या ऐटीणे सांगतात की,मी शेतकऱ्यांचा मुलगा आहे, मी कंडक्टर होतो,मी आटो चालवित होतो, खाजगी नौकरी करीत होतो, मोलमजुरी करून आपला प्रपंच चालवित होतो अशाप्रकारे अनेक उदाहरणे राजकीय पुढारी निवडून आल्यानंतर देतात.त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की निवडून आल्यानंतर अवघ्या पाच वर्षांत लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी कसे काय करोडपती होतात हे खरोखरच आश्चर्य नाही का?यावर राज्य सरकारांनी व केंद्र सरकारने लक्ष केंद्रित करण्याची नितांत गरज आहे. त्याचप्रमाणे महामहीम राष्ट्रपती, प्रधानमंत्री यांना विनंती करतो की, भ्रष्टाचाऱ्याच्या मुसक्या आवळण्यासाठी आपल्या पद्धतीने सर्वोतोपरी प्रयत्न केले पाहिजेत.तेव्हाच भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवता येईल व आळा बसेल.जय हिंद.

**-लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार ( स्वतंत्र पत्रकार ) नागपूर**

# पुण्याहून दिवेआगर कोकणात येणाऱ्या पर्यटकांची थार ताम्हाणी घाटातील खोल दरीत कोसळली, सहा जणांचा मृत्यू

**आत्ताच एक्सप्रेस**
**बोरघर / माणगाव ( विश्वास गायकवाड )**/ पुणे येथील सहा जीवलग मित्र थार मधून कोकणातील दिवेआगर येथे पर्यटनासाठी निघाले होते. वाटेत ताम्हिणी घाटातील एका अवघड वळणावर त्यांच्या वाहनाचे नियंत्रण सुटले आणि त्यांची थार तब्बल पाचशे फूट खोल दरीत कोसळली आणि भीषण अपघात झाला या अपघातात थार चा अक्षरशः चेंदामेंदा होऊन सहा जणांचा मृत्यू झाला. या बाबत माणगांव पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.२८३/२०२५ भा. न्या. संहिता २०२३ चे कलम १०६,१२५(अ),१२५ (ब), २८१ सह मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४ हा गुन्हा दि. १७/११/२०२५ रोजीचे रात्री ११.३० वा. पासुन दि.२०/११/२०२५ रोजी सकाळी ०९.०० वा.चे सुमारास घडलेला असुन दि.२०/११/२०२५ रोजी १७.२२ वाजता दाखल आहे.

सदर गुन्हयातील फिर्यादी विशाल सादु गोठे वय २८ वर्ष, व्यवसाय रिक्षा चालक रा. कोपरेगाव, उत्तमनगर, शिवणे, ता. हवेली, जि.पुणे यांचा भाउ साहील सादु गोठे वय- २४ वर्ष, व त्याचे सोबतचे मित्र २) पुनित सुधाकर शेट्टी वय २० वर्ष, ३) ओमकार सुनिल कोळी वय- १८ वर्ष, ४) शिवा अरूण माने वय १९ वर्ष, ५) महादेव कोळी, वय १८ वर्षे सर्व रा. कोपरेगांव, उत्तमनगर, शिवणे ता. हवेली जि.पुणे असे दिनांक १७/११/२०२५ रोजी रात्री ११.३० वाजताचे सुमारास महिंद्रा थार गाडी नंबर एमएच १२/वाय एन ८००४ ने कोपरेगाव जि.पुणे येथुन कोकणामध्ये दिवेआगर येथे फिरण्यासाठी निघाले होते. त्यानंतर दिनांक १८/११/२०२५ रोजीचे सकाळपासुन फिर्यादी यांचे घरातील लोकांनी तसेच मयताचे नातेवाईकांनी त्यांचे मोबाईलवर संपर्क साधला असता सदर गुन्हयातील मयताचे दिनांक. १८/११/२०२५ रोजीचे रात्री १२.०० वाजेपर्यंत त्यांचे मोबाईलवर कॉल लागत होते. त्यानंतर यांतील मयताचे फोन लागत नसल्याने मयताचे नातेवाईक यांना त्यांचे विषयी चिंता लागलेली असल्याने फिर्यादी व मयताचे नातेवाईक मित्र परिवार असे दिनांक १९/११/२०२५ रोजी पहाटे ०१.०० वाजता कोपरेगाव पुणे येथुन फिर्यादी व त्यांचे मित्र परिवार त्यांचे सोबतचे मित्रांचा शोध घेण्यासाठी निघाले. त्यांनी ताम्हीणी घाट मार्गे त्यांचा शोध घेत रस्त्याचे आजुबाजुला पाहणी करीत पहाटे ०४.०० वाजेपर्यंत विळेभागाड एमआयडीसी पर्यत आले.

परंतु रात्रीची वेळ असल्याने फिर्यादी व सोबतचे लोकांना फिर्यादी यांचा भाउ व त्याचेसोबतचे लोक व त्यांनी आणलेली थार गाडी दिसुन आली नाही. त्यानंतर ते माणगांव मार्गे दिवेआगर येथे रस्त्याचे आजुबाजुने पाहणी करत पोहचले.

तेथे गेल्यावर त्यांनी दिवेआगर बिच तसेच दिवेआगर मधील सर्व रस्ते, हॉटेल, लॉज, फॉर्महाउस या ठिकाणी जावुन साहील गोठे व त्याचे सोबतचे मित्रांचा तसेच त्यांनी आणलेल्या थार गाडीचा शोध घेतला.

परंतु ते कोठेही मिळुन आले नाहीत. म्हणुन यांतील







मयत प्रथम चव्हाण याचे वडील शहाजी विलास चव्हाण यांनी त्यांचा मुलगा व त्याचे पाच मित्र हे मिसींग झाले बाबत दि.१९/११/२०२५ रोजी उत्तम नगर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे तकार नोंद केली आहे. ती मनुष्य मिसींग रजि. नं.६८/२०२५ प्रमाणे दाखल आहे.

दिनांक. २०/११/२०२५ रोजी सकाळी ०७.०० वाजल्यापासुन ताम्हीणी घाटामध्ये १) रेस्क्यु चॅरीटेबल ट्रस्ट पुणे, २) शेलार मामा रेस्क्यु टीम माणगाव ३) डतठडड रेस्क्यु टीम, कोलाड ४) साळुंखे रेस्क्यु टीम माणगाव तसेच माणगाव पोलीस ठाणे यांचे मदतीने व ड्रोन कॅमेराद्वारे यांतील मयतांचा व थार गाडीचा शोध घेतला असता सकाळी ०९.०० वाजण्याचे सुमारास ताम्हीणी घाटातील खोल दरीमध्ये मौजे सणसवाडी गांवचे हद्दीत झाडी झुडपात थार गाडी व मयतांचे सहा प्रेत मिळुन आल्याने मयताचे नातेवाईक यांना सदर प्रेत दाखविले.

त्यांनी सदरचे प्रेत ओळखुन ते १) साहील सादु गोठे वय २४ वर्ष, २) प्रथम शहाजी चव्हाण वय-२२ वर्ष, ३) पुनित सुधाकर शेट्टी वय २० वर्ष, ४) ओमकार सुनिल कोळी वय १८ वर्ष, ५) शिवा अरूण माने वय १९ वर्ष, ६) महादेव कोळी, वय १८ वर्षे सर्व रा. कोपरेगांव शिवणे ता. हवेली जि. पुणे यांचे प्रेत असल्याचे ओळखले आहेत.सदरची कामगिरी मा.श्रीमती आंचल दलाल मॅडम, पोलीस अधिक्षक, मा.श्री. अभिजित शिवथरे सो, मा.अपर पोलीस अधिक्षक रायगड, मा.श्री. पुष्कराज सुर्यवंशी सो, उपविभागीय पोलीस अधिकारी माणगांव विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. निवृत्ती बोहाडे पोलीस निरीक्षक, सपोनि/ श्री. भैरु जाधव, मसपोनि/ श्रीमती लाड, पोहवा/११०० वर्तक, पोहवा /१०१८ सानप, पोह/१५९९ शिंदे, पोशि/ २४०० तांदळे, पोह/१३३२ गायकवाड, पोह/११७४ तुणतुणे, पोशि/१३१२ रणवीर, पोशि/१२५० बांडे सर्व नेमणुक माणगांव पोलीस ठाणे यांनी केलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास सपोनि श्री. जाधव हे करीत आहेत.

# संक्षिप्त

## राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून जि.प वाळूज सर्कलसाठी युवकचे जिल्हा उपाध्यक्ष निखिल साळवे इच्छुक!

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर/ प्रतिनिधी/ सुभान शहा**/ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. नगरपरिषद आणि नगरपालिका निवडणुकांच्या वेळापत्रकानंतर आता अभ्यासू अशी ओळख असलेले निखिल साळवे हे त्यांच्या परखड वक्तृत्व शैलीमुळे तरुण पिढीत लोकप्रिय आहेत.यंदा त्यांनी देखील निवडणुकीच्या अनुषंगाने मोर्चेबांधणी सुरू केल्याचे दिसून येत आहे,ते गंगापूर तालुक्यातील



महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांचे वारे वाहत आहेत.यामुळे इच्छुकांनी आपली मोर्चेबांधणी तीव्र केली आहे. यातच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे युवक जिल्हा उपाध्यक्ष निखिल लक्ष्मण साळवे यांनी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी आपली इच्छुक उमेदवारी सोशल मीडिया पोस्टद्वारे जाहीर करत तयारी सुरू केल्याचे स्पष्ट होत आहे.साळवे यांनी विद्यार्थी ते समाजकार्य असा प्रवास करत आपल्या कार्यातून प्रभावी ठसा उमटवला आहे. युवा नेतृत्वाचा प्रभाव निखिल साळवे हे तरुणांमध्ये एक सकारात्मक आणि प्रभावशाली युवा चेहरा म्हणून ओळखले जातात.ते पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. शांत,संयमी आणि औद्योगिक वसाहतीतील महत्त्वाच्या वाळूज सर्कल मधून लढण्याची शक्यता आहे.

सध्या सर्कलमध्ये अनेक आजी-माजी दिग्गज चेहरे निवडणुकीसाठी तयारीत असताना,माजी स्व.सरपंच गंगाधरराव केदारे व स्व.सरपंच सुभाष तुपे यांचे नातू असलेले निखिल साळवे यांच्यासारखा एक नवीन, सुशिक्षित युवा चेहरामैदानात उतरल्याने ही निवडणूक अधिक रंगतदार होणार यात शंका नाही! आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत पक्षाकडून अधिकृत उमेदवारी कोणाला मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पक्षाने निखिल साळवे यांना संधी दिल्यास वाळूज सर्कलमधील लढत निश्चितच चुरशीची होईल,अशी चर्चा या भागात सुरू आहे.

## रस्ता व पुल वाहून गेल्याची 'आत्ताच एक्सप्रेस'ची बातमी परिणामकारक!
## पाटबंधारे विभागाची तात्काळ दखल - पाहणी करून जलद दुरुस्तीचे आश्वासन

**आत्ताच एक्सप्रेस**
**अंबड प्रतिनिधी** / अंबड तालुक्यातील कुक्कडगाव येथे सुखापुरी धरणासाठी १९९९ साली बांधण्यात आलेला मुख्य रस्ता आणि पुल अतिवृष्टीत वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे हाल अधिकच वाढले आहेत. धरणासाठी जमिनी संपादित झाल्यानंतर उरलेल्या शेतजमिनींकडे जाण्यासाठी हा एकमेव मार्ग असल्याने रस्ता खंडित झाल्याचा थेट परिणाम शेतीकाम, पिकांची देखभाल आणि उत्पादन वाहतुकीवर होत आहे.

या गंभीर समस्येवर दैनिक आत्ताच एक्सप्रेस'ने १८ नोव्हेंबर २०२५ रोजी वस्तुनिष्ठ वृत्त प्रसिद्ध केले. बातमी प्रसिद्ध होताच पाटबंधारे विभागाने तातडीने दखल घेतली आणि पाहणी पथक कुक्कडगावात रवाना केले.

लघुपाटबंधारे अंबड उपविभागाचे उपविभागीय अधिकारी फुलवळकर , अभियंता पूजा दरोडे , तसेच स्था. अभियांत्रिकी सहाय्यक साळुंके यांनी प्रत्यक्ष साइटला भेट देऊन वाहून गेलेल्या रस्ता-पुलाची स्थिती, पाण्याचा प्रवाह, झालेली हानी आणि शेतकऱ्यांच्या समस्या यांचा सविस्तर आढावा घेतला.




शेतकऱ्यांनी पाहणी पथकास सांगितले की-

रस्ता बंद असल्यामुळे भाजीपाला, ऊस, मोसंबी, सोयाबीन, कापूस आदी पिकांची वाहतूक ठप्प झाली आहे.

पुढील पेरणी हंगामही धोक्यात आहे.

रस्ता आणि पुलाची तात्काळ दुरुस्ती अत्यावश्यक झाली आहे.

विभागाने पाहणीनंतर पुढील कार्यवाहीचा अहवाल तयार करण्याचे संकेत दिले असून शेतकऱ्यांनी काम लवकरात लवकर सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

दरम्यान शेतकऱ्यांनी इशारा दिला की या समस्येकडे दुर्लक्ष केल्यास आम्हाला या धरणात जलसमाधी घ्यावी लागेल!

## बीड़कीन भागात घुटखा गुंडांचा परिसरात धुमाकूळ...

**आत्ताच एक्सप्रेस**
**बीड़कीन प्रतिनिधी** / पैठण तालुक्यात बीड़कीन हि मोठी बाजारपेठ आहे. महाराष्ट्र सरकारने बंदी घातलेला घातलेला घुटखा व सुगंधी तंबाखू विक्री करणार्या माफियांनी अक्षरशः हैदोस घातला असून या अवैध चालणार्या घुटखा धंद्या विषयी अन्न, औषध भेसळ प्रशासनाच्या काही अधिकारी व कर्मचारी यांना या धंद्याची अत्यंत माहिती ठेवतात प्रत्येक महिन्याला अशा धंद्यावाल्या सोबत संपर्क होतेच अशी माहिती समोर आली आहे.घुटखा गुंडांनशी फोन वर बोलतात त्यांचा वेगळा कोडवर्ड बोलला जातो. यातून अर्थ पूर्ण संबंध जोपासले जात आहे असे बोलल्या जात आहे. व बीड़कीन येथील गुटखा माफिया कडून एक महिना अगोदर पुढील एक महिन्याचा मेवा मिठाई भेट दिली जाते यात काही कर्मचारी व अधिकार यांमुळे अन्न, औषध भेसळ प्रशासन असून अडचण




नसून खोळंबा असून घुटखा गुंडांचा मोठा प्रशासन व राजकिय वरदहस्त असल्याने त्यामुळे कारवाई शून्य.गाव तिथे टपरी, टपरी तेथे घुटखा सहज मिळत असून तरुणपिढी मात्र व्याधींचा आहारी जात आहे. आता गुटखा गुंडांनी नामी शक्कल लढविली असून घुटखयांची तस्कर कंटेनर,आयशर, तवेरा,एर्टीगा, स्कोड़ फॉरचुनर,बेन्ज़्, द्वारे केली जाते.टपरी दुकान व घरपोच घुटखा,ऑनकॉल ही संकल्पना आहे. गुटखा माफिया पोलिस व अन्न, औषध भेसळ विभागाचा नाकावर टिचुन यशस्वी प्रमाणे बिनबोभाट पणे ग्रामीण भागासह तालुक्यातील गावोगावी राबवत आहे.

## हतनुर येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांनी २९ वर्षानंतर स्नेहसंमेलन

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड प्रतिनिधी/सुनिल निकम** / कन्नड तालुक्यातील हतनूर येथील जिल्हा परिषद प्रशालेतील १९९५-१९९६ च्या दहावीच्या बॅचचे विद्यार्थी तब्बल २९ वर्षांनंतर १६ नोव्हेंबर रोजी एकत्र आले. दीर्घकाळानंतर झालेल्या भेटीत अनेकांच्या डोळ्यांत पाणी तरळले.

हीच ती शाळा जिथे आपण अक्षर ओळखले, शिस्त शिकलो आणि जीवनातील संघर्षांना सामोरे जाण्याची प्रेरणा मिळाली. या शाळेनेच आपल्याला जगण्याचे आणि जगवण्याचे बळ दिले. ज्या शाळेने 'ज्ञानाचे कर्ज' दिले, ते काही प्रमाणात फेडण्याचा प्रयत्न करूया, अशा भावना या विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

**स्नेहमेळाव्यास निवृत्त स्नेहमेळाव्यात आठवणींना दिला उजाळा**

शिक्षक भागीनाथ भवर, अंबादास साळुंके, वसंतराव अकोलकर, काशीनाथ राऊत, तोतराम दांडगे, शेषराव देशमुख, साहेबराव पवार उपस्थित होते. त्यांचा विद्यार्थ्यांनी फोटो फ्रेम देऊन सन्मान केला. विशेष म्हणजे या विद्यार्थ्यांना त्यांच्या जुन्या वर्गात बसवून प्रतीकात्मक ३० मिनिटांचा तास घेण्यात आला. या सत्रात सर्वांनी शालेय जीवनातील गोड आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाला एकूण ९२ विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत आपल्या आयुष्यातील सध्याच्या घडामोडींबद्दल माहिती दिली.

सूत्रसंचालन सपना पांडे, प्रास्ताविक योगेश्वर बिडवे यांनी केले. जयप्रभा कोकाटे यांनी आभार मानले.



## महाराष्ट्रातील महापूर : अभ्यास अहवालाचे प्रकाशन संपन्न
## महापूर समस्येवरील उपाय ही शासन, प्रशासन आणि समाजाची सामूहिक जबाबदारी!

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतितिनिधी**/ मराठवाड्यासह महाराष्ट्रात इतरत्रही यावर्षी झालेली अतिवृष्टी आणि त्यामुळे आलेल्या महापुरामुळे शेतीची अपरिमित हानी झालेली आहे. गावसमाज विस्कळीत झाला आहे. जनजीवन पूर्ववत होण्यासाठी समाज आणि शासनाचे संवेदनशील आणि नियोजनबद्ध प्रयत्न आवश्यक आहेत.

ही केवळ नैसर्गिक आपत्ती नव्हती तर संरचनात्मक आणि नियोजनात्मक गंभीर चुका, त्रुटी आणि बेजबाबदारपणा यांचा हा एकत्रित परिणाम होता. अशा तऱ्हेच्या संकटांची वारंवारिता पाहता त्यावर दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरजच नव्हे तर तातडी आहे. त्यासाठी शाश्वत विकासाची दृष्टी व दिशा आवश्यक आहे. या सर्व स्थितीवर उपयांसाठी शासन, प्रशासन आणि समाजाने एकत्रित येत सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचा सुर 'महापूर : कारणे आणि उपाय - अभ्यास' या विषयावरील चर्चासत्रात मान्यवरांनी काढला.

जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय आणि महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कम्म्युनिकेशन,कल्चर अँड मिडिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'महापूर : कारणे आणि उपाय - अभ्यास' अहवालाचे प्रकाशन व चर्चा सत्राचे आज विनोबा भावे सभागृहात आयोजन करण्यात आले होते.

या चर्चासत्रात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर प्रा.प्रदीप पुरंदरे, सोमीनाथ घोळवे, सुनीती सु.र, डॉ.संजय मंगला गोपाळ, डॉ.रेखा शेळके आदि मान्यवर सहभागी झाले होते.

यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, ज्येष्ठ गांधीवादी श्रीराम जाधव, अर्थतज्ञ प्रा.एच. एम. देसरडा व सर्व संबंधित मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक इब्राहिम खान यांनी केले. या चर्चासत्रात केवल फडतरे, झुल्पिकार काझी, वैभवी प्रेमलता संजय व सर्व संबंधितांनी हा अहवालाच्या संदर्भाने आपले अनुभव मांडले. या चर्चासत्रात सहभागी झालेल्या मान्यवरांनी व्यक्त केलेले विचार खालीलप्रमाणे आहेत.

**मेधाताई पाटकर** : या अहवालात गेली २ महिन्यात आम्ही सर्व सहकाऱ्यांनी पूरग्रस्त भागात जाऊन शेतकरी आणि सर्व बाधित भागाला भेट देऊन सत्य स्थिती मांडण्यात आली आहे. आज जल, जंगल आणि जमिनीसाठी लढणाऱ्या लोकांवर हल्ले होत आहेत. ग्रामीण भागातील संस्थांना उभे करण्याचे काम करणे आवश्यक आहे. बाधित व्यक्तींना तत्काळ मदत करण्याची गरज आहे.






सुनीती सु. र. : हवामान बदल हे एक वास्तव आहे. त्याला कसे सामोरे जायचे आहे? हा विचार करणे आवश्यक आहे. आत्ताच्या स्थितीचा वैज्ञानिक अभ्यास करून नियोजन करणे आवश्यक आहे.

नद्यांमध्ये अतिक्रमण झालेले असून नद्यांचे ओढे आणि नाले झालेत. हे थांबणे आवश्यक आहे. झालेले नुकसान झालेले पाहता शेतकरी पुढील पेरणी करू शकणार नाहीत. ही पाहणी, हा अभ्यास, या शिफारशी आणि या परिस्थितीवर मार्ग काढण्यासाठी आता तत्काळ कामाला लागले पाहिजे. समाजाने आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक दिनचर्येचा विचार करणे आवश्यक आहे.

**प्रा.प्रदीप पुरंदरे** : एकच गोष्ट कितीवेळा सांगायची असे सध्या वाटत आहे. मोठ्या प्रमाणात नदी भागात अतिक्रमण होत आहे. अतिक्रमण हटवण्यासाठी कोण जबाबदार आहे? नदीची अधिसूचना काढणे आवश्यक आहे.

कालवा अधिकारी यांची नेमणूक होत नाही. जलसंधारणाच्या संदर्भात कायदे आहेत मात्र, त्यातील काही कायद्यांसाठी नियम नाहीत. संविधानिक प्रक्रियेनुसार पाणी हा राज्याचा विषय आहे. सिंचनासाठी ९ कायदे बनवले आहेत मात्र, त्यातील ८ कायद्यांचे नियम केले गेले नाहीत.

प्रत्येक नदीची अधिसूचना काढणे अत्यंत गरजेचे आहे. शासन विचार क्षमता गमावून बसले असून त्यांच्या हातून परिस्थिती निघून जात आहे. जलयुक्त शिवार याची गरज नव्हती. १३ योजनांची एकत्रितता करून जलयुक्त शिवार ही योजना राबविण्यात आली. नदीवरती हजारो बंधारे बांधले, याची कोणीही परवानगी घेतली नाही. जलयुक्त शिवारचा चुकीचा परिणाम झालेला आहे.

**सोमीनाथ घोळवे** : समस्यांच्या उपायांसाठी धोरणाचे सोशल ऑडिट होणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात ८५% अल्पभूधारक आहेत. कोणतेही गाव आपण उदा. घेतले की, काही बाबी लक्षात येते.

आपल्याकडे यंत्रणा नावाची गोष्ट नाही. ३० वर्षापूर्वी जितक्या विहिरी होत्या त्यापेक्षा कितीतरी अधिकारी विहिरी आता झाल्या आहेत. बांध राहिले नाहीत, सगळ्या जमिनी सपाट झाल्या आहेत.

**डॉ.संजय मंगला गोपाळ** : या अहवालात भूमिका, पार्श्वभूमी, काय घडले? - उद्ध्वस्त जीवनाची हकीकत, का घडले ? - पूरसंकटाची कारणमीमांसा, पुनर्वसनाच्या वाटेवरील काटे, 'तात्कालिक मदत' व त्यापलीकडे पुनर्वसन : काय असावे धोरण आणि प्रक्रिया, जल व्यवस्थापन : शासनाची जबाबदारी, जागतिक हवामान बदल आणि पूर संकट, समारोप : निसर्गसंवादी विकास नियोजनाची पाऊलवाट हवी आदि प्रकरणे असून याबद्दल अभ्यासाअंती सर्व सत्य परिस्थिती मांडलेली आहे.

# संक्षिप्त

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे कामकाज सुरळीतपणे सुरु ; अफवांवर विश्वास ठेवू नका

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांच्या अंतर्गत राज्यामध्ये जास्तीत-जास्त मराठा उद्योजक उभे करण्याचे काम महामंडळामार्फत केले जात आहे. अलीकडील काही दिवसांपासून मराठा समाजातील बेरोजगार युवकांसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत महामंडळाचे कामकाज बंद झाले आहे, व्याज परतावा थांबविण्यात आला आहे अशा प्रकारच्या निराधार अफवा काही व्यक्तींकडून सोशल मीडियासह विविध माध्यमांतून पसरविल्या जात आहेत. या अफवांना कोणतेही तथ्य नसून, महामंडळाचे नवीन पात्रता प्रमाणपत्र देण्याचे काम वगळता इतर सर्व कामकाज सुरळीतपणे सुरु आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालय जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, जालना येथे संपर्क साधावा. असे अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक उमेश कोल्हे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## सैन्य दलातील अधिकारी पदाच्या पुर्व प्रशिक्षणाची संधी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्विस सिलेक्शन बोर्ड या परीक्षेची मोफत पुर्व तयारी करुन घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे महाराष्ट्र शासनाकडून एसएसबी कोर्स क्र. ६४ आयोजित करण्यात येणार आहे. तरी जालना जिल्ह्यातील इच्छूक युवक-युवतींनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत मुलाखतीस हजर रहावे. संपुर्ण प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना नि:शुल्क प्रशिक्षण, निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अधिक माहितीसाठी दुरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सअप क्र. ९१५६०७३३०६ वर संपर्क करावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## दिव्यांग क्षेत्रातील व्यक्ती व संस्थांना आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थाना नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. जालना जिल्ह्यातील दिव्यांग क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्था व त्यांच्याकडे दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ४९-५३ नुसार वैद्य नोंदणी प्रमाणपत्र नाहीत. अशा नागरी समाज संघटना/संस्थांनी १७ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील नमुद प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी जिल्हा परिषद जालना यांच्या कार्यालयात दि. २७ नोव्हेंबर २०२५ रोजी किंवा त्यापुर्वी समक्ष उपस्थित राहून सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी. एम. यांनी केले आहे.

दिव्यांग कल्याण विभागाच्या १७ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांच्या नोंदणी देखरेख आणि नूतनीकरणासाठी मानक कार्यप्रणाली विहित करण्याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करुन महाराष्ट्र शासन दिव्यांग व्यक्तीची प्रतिष्ठा, हक्क आणि सुरक्षा यांच संरक्षण करण्यास कटिबध्द आहे. दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणात नागरिक, नागरी समाज संघटना/संस्था महत्वपुर्ण भूमिका बजावतात. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ४९-५३ पुनर्वसन आणि सक्षमीकरण क्षेत्रात काम करणाऱ्या नागरी समाज संघटनांची/संस्थांची नोंदणी अनिवार्य आहे. तथापी दिव्यांग क्षेत्रात अनेक नागरी समाज संघटना/संख्या अद्याप वैद्य नोंदणीशिवाय दिव्यांग क्षेत्रात कार्यरत आहेत, असे निदर्शनास आले आहे. ही बाब दिव्यांग हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ५० चे उल्घंन करणारी आहे. कोणतीही व्यक्ती अथवा नागरी समाज संघटना/संस्था दिव्यांग क्षेत्रात वैद्य नोंदणीशिवाय कार्य करु शकत नाही, असे स्पष्ट नमूद आहे. यासंदर्भात दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालयाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली ७ बैठक घेऊन यासंदर्भात निर्देश दिले आहेत. ज्या संस्थां दिव्यांग क्षेत्रात काम कीरीत आहेत व त्यांच्याकडे दिव्यंग क्षेत्रात कार्य कण्याकरीता वैद्य नोंदणी प्रमाणपत्र नाही अशा संस्थांनी वैद्य नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा प्रस्ताव सादर करावा वैद्य नोंदणी प्रमाणपत्राशिवाय दिव्यांग क्षेत्रात काम करीत असल्यास दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ९१ अन्वये दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थावर कारवाई करण्यात येईल. असे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी जि.प. जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# नुतन वसाहतीत सरपंच बाबासाहेब सोमधाने यांची भरदिवसा निर्घृण हत्या; तलवारीने वार करून ठार - तिघे संशयित पोलिस ताब्यात



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / जालना शहरातील नुतन वसाहत परिसरात आज दुपारी साडेचारच्या सुमारास घडलेल्या धक्कादायक घटनेत देऊळगाव ग्रामपंचायतीचे सरपंच बाबासाहेब सोमधाने (वय ४५) यांची अज्ञात हल्लेखोरांनी तलवारीने वार करून निघृण हत्या केली.

**अचानक हल्ला - तलवारीने सलग वार**

मिळालेल्या माहितीनुसार, सोमधाने भाजीपाला घेत असताना एका चारचाकी वाहनातून आलेल्या हल्लेखोरांनी थेट त्यांच्यावर धाव घेतली. तलवार व इतर धारदार शस्त्रांनी छाती व पोटावर सलग वार करत हल्लेखोर काही क्षणातच वाहनासह पसार झाले. गंभीर जखमी अवस्थेतच सोमधाने घटनास्थळी कोसळले आणि त्यांचा तत्काळ मृत्यू झाला.

**पोलिसांची झटपट कारवाई - तीन संशयित ताब्यात**

घटनेनंतर पोलिसांनी तातडीने परिसर सील करून तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज, वाहनाचा मागोवा, मोबाईल लोकेशन आणि प्रत्यक्षदर्शींच्या जबाबांच्या आधारे तपास वेगाने सुरू असून तीन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे. प्राथमिक तपासात जमिनीच्या वादाची शक्यता तपासात पुढे येत असली तरी अद्याप अधिकृतरीत्या कारण स्पष्ट करण्यात आलेले नाही.

**परिसरात तणाव; गावात शोककळा**

घटनेची माहिती पसरताच नुतन वसाहत परिसरात तसेच जालना शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. देऊळगाव गावात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. आरोपींना कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**पुढील तपास सुरू**

भरदिवसा झालेली ही हत्या पूर्वनियोजित असल्याची शक्यता तपासात गंभीरपणे विचारात घेतली जात आहे. आरोपींची नेमकी भूमिका, कारणे आणि हल्ल्यामागील हेतू तपासात लवकरच स्पष्ट होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत २५ नोव्हेंबरला भरती मेळाव्याचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथे दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लिमीटेड कंपनी पुणे यांचे कॅम्पस इंटरव्हयू बाबत. आयटीआय उत्तीर्ण असणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था जालना द्वारा मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र कार्यालय, जालना या ठिकाणी दि. २५ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लिमिटेड कंपनी पुणे यांच्या वतीने येथे विविध व्यवसायात भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

इलेक्ट्रिशियन, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, फिटर, इन्स्ट्रुमेंट मेकॅनिक, मशीन मेकॅनिक टूल मेंटेनन्स, मशीनिस्ट, मशीनिस्ट, (ग्राइंडर), मेकॅनिक (मोटर व्हेईकल), मेकॅनिक डिझेल, मेकॅनिक रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग, मेकॅनिक ट्रॅक्टर, पेंटर (जनरल), प्लास्टिक प्रोसेसिंग ऑपरेटर पंप ऑपरेटर कम मेकॅनिक, शीट मेटल वर्कर, टूल अँड डाय मेकर (प्रेस टूल्स, जिग्स अँड फिक्स्चर), टर्नर, वेल्डर (गॅस आणि इलेक्ट्रिक), वायरमन आदि व्यवसायातील उमेदवार यात सहभागी होवू शकतील. आयटीआय उत्तीर्ण असणा-या प्रशिक्षणार्थ्यांनी या भरती मेळाव्यात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे. सोबत शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, आधारकार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट फोटो सोबत आणणे आवश्यक राहिल. या भरती मेळाव्यात आय.टी.आय. उत्तीर्ण असणारे असणा-या उमेदवारांनी सहभागी होण्याचे आवाहन सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार, बी.टी. आर. आय., जालना यांनी केले आहे.

# क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज सादर करावेत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, जालना मार्फत जिल्हयातील गुणवंत क्रीडापटू, गुणववंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे / योगदानाचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे जिल्हा क्रीडा पुरस्कार जिल्हयातील ०१ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक, गुणवंत खेळाडू ( ०१ पुरूष, ०१ महिला व ०१ दिव्यांग खेळाडू ) असे एकुण ०४ पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.

सन २०२४-२५ च्या जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी दि. १ जुलै २०२४ ते ३० जून २०२५ सदर कालावधीसाठी वर्षाच्या खेळाडूसाठी मागील पाच वर्षाची कामगिरी व क्रीडा मार्गदर्शकासाठी मागील दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल. गुणवंत खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपुर्व पाच वर्षपैकी दोन वर्षे त्या जिल्ह्याचे मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे. गुणवंत मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्ष महाराष्ट्र राज्यात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केलेले असले पाहिजे व त्याने पुरस्कार वितरीत करण्यात येणाऱ्या वर्षात वयाची ३५ वर्षे पुर्ण केलेली असणे आवश्यक आहे. क्रीडा मार्गदर्शकासाठी गेल्या दहा वर्षात किमान वरिष्ठ गटातील राज्य व राष्ट्रीय पदक विजेते तसेच कनिष्ठ शालेय मधील राज्य ते राष्ट्रीयस्तरापर्यंतचे पदक विजेते खेळाडू तयार केले असतील असे क्रीडा मार्गदर्शक अर्ज करण्यास पात्र राहतील. सांघिक अथवा वैयक्तीक मान्यता प्राप्त क्रीडा प्रकारात नॅशनल गेम्स, वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेला खेळाडू अथवा राज्य / जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकापर्यंत यश मिळविणारे किमान तीन खेळाडू घडविणारा मार्गदर्शक विहित नमुन्यातील अर्ज संघटनेमार्फत अथवा वैयक्तीकरित्या मुदतीत सादर करणे आवश्यक राहिल.

जालना जिल्ह्यातील पात्र असलेल्या व्यक्तींनी पुरस्कारासाठी परिपुर्ण अर्ज, सदर पुरस्काराबाबत अर्जाचा नमुना दि.१६/१०/२०१७ च्या शासन निर्णयान्वये सदर पुरस्काराचे अर्ज दि. १५ डिसेंबर २०२५ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना येथे पोस्टव्दारे सादर करावेत. अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी आरती चिल्लारे मो. क्र. ७७५८८६३९९१ यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन, जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना यांनी केले आहे.

# श्रीकृष्ण नगर (जामवाडी) येथील माजी सैनिकांचा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या हस्ते भाजपमध्ये जाहीर प्रवेश

श्रीकृष्ण नगर (जामवाडी)/ येथील माजी सैनिक गणेश मोतीलाल लष्कर, कैलास प्रल्हाद कोल्हे, गणपत विठ्ठल मानकर यांनी तब्बल १७ वर्षे गौरवशाली देशसेवा बजावून भारतीय सेना निवृत्तीनंतर भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.



देशसेवेनंतर सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सक्रिय सहभागाची इच्छा ठेवत त्यांनी माजी केंद्रीय मंत्री मा. श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षात प्रवेश केला.

यावेळी भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, देशासाठी आपले तरुणपण खर्च करून सेवेचा आदर्श निर्माण करणारे हे माजी सैनिक आज भारतीय जनता पक्षात दाखल होत आहेत, हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे.

त्यांच्या अनुभवाचा, शिस्तीचा आणि देशभक्तीचा समाजकार्य आणि पक्ष संघटन करण्यासाठी निश्चितच मोठा लाभ होणार आहे. भाजपमध्ये काम करताना त्यांनी जसे सीमेवर देशासाठी उभे राहिले, तसेच समाजहितासाठीही ते ठामपणे उभे राहतील, असा विश्वास व्यक्त केला व पक्षात स्वागत केले.

प्रवेश करताना त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सेनेची ताकद, आत्मविश्वास आणि तयारी यात ऐतिहासिक वाढ झाली आहे. देशाची सीमा अधिक सुरक्षित करण्यासाठी मोदी सरकारने मोठी पावले उचलली आहेत. अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, माजी जिल्हा सरचिटणीस देवीदास देशमुख, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, प्रा.राजेंद्र भोसले, कपिल दहेकर, कैलास उबाळे, रवी कायंदे, गोवर्धन कोल्हे, राजेश जोशी, ज्ञानेश्वर उगले, निवृत्ती लंके, डोंगरसिंग साबळे, शाम जाधव, अनिरुद्ध पांजगे आदींची उपस्थिती होती.

# 'लिव्ह-इन'ला संरक्षण, पण पहिल्या पत्नीचे काय? आता द्रौपदी बनून वस्त्रहरणाची वाट पाहू नका, आत्मनिर्भर व्हा!- ड. महेश एस. धन्नावत, कार्याध्यक्ष, नोटरी असोसिएशन

पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या एका निकालाने पुन्हा एकदा सामाजिक आणि कायदेशीर वर्तुळात मोठी चर्चा सुरू केली आहे. विवाहित असूनही पती आणि मुलाला सोडून प्रियकरासोबत 'लिव्ह-इन रिलेशनशिप'मध्ये राहणाऱ्या एका महिलेला आणि तिच्या प्रियकराला न्यायालयाने जीविताच्या रक्षणाचे संरक्षण दिले आहे.

न्यायालयाचा हा निर्णय कायद्याच्या चौकटीत योग्य असला तरी, यामुळे मागे राहिलेल्या पत्नी आणि मुलांच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, असे मत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धन्नावत यांनी व्यक्त केले आहे. आता प्रत्येक स्त्रीने आत्मनिर्भर होण्याची आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची वेळ आली आहे, जेणेकरून कोणत्याही महिलेवर निराधार होण्याची वेळ येऊ नये, असे आवाहन त्यांनी केले.

पंजाबमधील 'बानो विरुद्ध पंजाब सरकार' या प्रकरणात, याचिकाकर्ता क्रमांक १ (एक विवाहित महिला) तिचा पती आणि एका मुलीला सोडून याचिकाकर्ता क्रमांक २ (एक अविवाहित पुरुष) सोबत 'लिव्ह-इन'मध्ये राहत होती. त्यांना आपल्या जीवाला धोका असल्याची भीती वाटत असल्याने त्यांनी न्यायालयाकडे संरक्षणाची मागणी केली. न्यायालयाने भारतीय संविधानाच्या कलम २१ नुसार प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा आणि स्वातंत्र्याचा हक्क असल्याचे स्पष्ट करत, त्यांच्या जीविताला कोणताही धोका पोहोचू नये यासाठी पोलीस संरक्षणाचे निर्देश दिले.

ड. धन्नावत यांनी न्यायालयाच्या निकालाचे विश्लेषण करताना सांगितले की, न्यायालयाने घेतलेली भूमिका अत्यंत संतुलित आहे. एका बाजूला, न्यायालयाने स्पष्ट केले की कायदा हातात घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. संबंधांना सामाजिक मान्यता असो वा नसो, कोणत्याही व्यक्तीच्या जीविताला धोका निर्माण झाल्यास संरक्षण देणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे. त्यामुळे न्यायालयाने याचिकाकर्त्यांना संरक्षण दिले.

परंतु, त्याचवेळी न्यायालयाने निकालाच्या परिच्छेद १७ मध्ये हे देखील स्पष्ट केले आहे की, 'या आदेशामुळे पीडित व्यक्तीला (म्हणजे महिलेच्या पतीला) याचिकाकर्त्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यापासून रोखले जाणार नाही.' याचा अर्थ, न्यायालयाने केवळ जीविताचे संरक्षण दिले आहे, त्यांच्या अनैतिक संबंधांना कायदेशीर मान्यता दिलेली नाही. पीडित पती घटस्फोट, पोटगी आणि मुलांच्या ताब्यासाठी कायदेशीर लढाई लढू शकतो, असे ड. धन्नावत यांनी नमूद केले.

या सामाजिक समस्येवर बोलताना ड. धन्नावत यांनी महाभारतातील द्रौपदीच्या वस्त्रहरणाचा हृदयस्पर्शी संदर्भ दिला. ते म्हणाले, जेव्हा भर सभेत दुःशासन द्रौपदीचे वस्त्रहरण करत होता, तेव्हा तिचे पाच बलाढ्य पती असूनही तिचे रक्षण करू शकले नाहीत. ते सर्वजण हतबल झाले होते. अखेरीस, द्रौपदीने श्रीकृष्णाचा धावा केला आणि तेव्हाच तिची लाज राखली गेली. आजच्या युगातही अनेक स्त्रिया पतीवर पूर्णपणे अवलंबून असतात. पण जेव्हा पतीच तिला सोडून जातो, तेव्हा तिची अवस्था त्या असहाय्य द्रौपदीसारखी होते. तिला कायद्याचा आणि समाजाचा धावा करावा लागतो.

म्हणूनच, आजच्या स्त्रीने द्रौपदीप्रमाणे केवळ पती किंवा नशिबावर अवलंबून न राहता, स्वतःच स्वतःची 'कृष्ण' बनले पाहिजे. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि कायदेशीर हक्कांची जाण, हीच तिची खरी शक्ती आहे. जर स्त्री आर्थिकदृष्ट्या सक्षम असेल, तर तिला कोणत्याही परिस्थितीत निराधार होण्याची भीती राहणार नाही, असे भावनिक आवाहन त्यांनी केले.

कायदा प्रत्येकाच्या जीविताचे रक्षण करतो, पण सन्मानाचे आणि भविष्याचे रक्षण हे स्वतःच्या सामर्थ्यानेच करावे लागते. न्यायालयाच्या या निकालाने एकीकडे कायद्याचे राज्य अबाधित ठेवले आहे, तर दुसरीकडे समाजाला, विशेषतः महिलांना, आत्मनिर्भरतेचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

कोणत्याही महिलेवर रस्त्यावर येण्याची वेळ येऊ नये, यासाठी तिने स्वतःला सक्षम करणे हाच एकमेव आणि शाश्वत उपाय आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813